अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील महत्वाच्या स्थळांचा विकास करणे याअंतर्गत दिपांकर विपश्यना मेमोरियल ट्रस्ट, मु.कासने, पो.वासिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी निधी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : स्वसेअं-२०१६/प्र.क्र.१४२/बांधकामे

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १५ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.१६/१२/२०१५.

२) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/ मावक/ऐति.स्थळे/ दिविमेट/ २०१७-१८/का-१२/१४५१, दि.९/१०/२०१७.

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन पत्र, क्र. बैठक-२०१६/प्र.क्र.४३७/ बांधकामे, दि.६/१/२०१७ चे इतिवृत्त.

४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बैठक-२०१६/ प्र.क्र.४३७/ बांधकामे, दि.३०/०३/२०१७.

प्रस्तावना : -

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींची स्मारक बांधणे तसेच महत्वाच्या सांस्कृतिक व ऐतिहासीक स्थळांचा विकास करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूरकरण्या विषयीचे निकष मार्गदर्शक तत्वांना संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या विहित कार्यपध्दती नुसार संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये, आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी दिपांकर विपश्यना मेमोरियल ट्रस्ट, मु.कासने, पो.वासिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी सादर करण्यात आलेला रु.२,००,००,०००/- (रुपये दोन कोटी फक्त) इतक्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर केला आहे. सदर अंदाजपत्रकात दिपांकर विपश्यना मेमोरियल ट्रस्ट, मु.कासने, पो.वासिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील पर्यटन स्थळाचा विकास करणे प्रस्तावित आहे. अंदाजपत्रक सहायक अभियंता वर्ग-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भिवंडी यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, ठाणे यांनी साक्षांकित केले आहे.

मा.मंत्री, (सा.न्या.व वि.स.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या दि. १३.०७.२०१६ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली होती. तदनुषंगाने सदर प्रस्तावाच्या रु.२,००,००,०००/- (रुपये दोन कोटी फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी दिपांकर विपश्यना मेमोरियल ट्रस्ट, मु.कासने, पो.वासिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी रु.२,००,००,०००/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केले होते. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केलेल्या सुधारित रक्कम रु.१,६३,१४,०००/- (रुपये एक कोटी त्रेसष्ट लाख चौदा हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. एकूण अंदाजपत्रकीय खर्चामध्ये शासनाचा हिस्सा ९० टक्के इतका व संबंधित संस्थेचा हिस्सा १० टक्के इतका असेल.:-

१) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ता.क्र.१, दि.१० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/ इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

६) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रकावर उपभोक्ता विभागाच्या वतीने सक्षम अधिकाऱ्याचे साक्षांकन आवश्यक आहे.

७) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

२. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात नमूद मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन दिपांकर विपश्यना मेमोरियल ट्रस्ट, मु.कासने, पो.वासिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील पर्यटन स्थळाचा विकास करणे या प्रकल्पावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सदर शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तर समितीची राहील. वर नमूद सर्व अटी अध्यक्ष, दिपांकर विपश्यना मेमोरियल ट्रस्ट, मु.कासने, पो.वासिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे यांनी मान्य असल्याबाबत करारपत्र करुन घ्यावे. शासनाच्या वतीने करारपत्रावर सही करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे यांनी प्रकल्पाच्या बांधकामाच्या सद्य:स्थितीचा त्रैमासिक अहवाल आणि वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना वेळीच सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३ संदर्भ क्र.४ येथील दि.३०.०३.२०१७ च्या शासन निर्णयाच्या सोबतच्या विवरणपत्र “अ” मध्ये नमूद प्रस्तावांसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात मागणी क्र.एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१- अनुसूचित जातीचे कल्याण, ८००-इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०५), स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (०५)(०२),स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (वि.घ.यो.) (२२२५ ३६३६), ३१ - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (योजनातर्गत-दत्तमत्त) या लेखाशीर्षाखाली मंजूर तरतूद, ठेव अंशदान स्वरुपात समन्वयक तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तुत शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या

दिपांकर विपश्यना मेमोरियल ट्रस्ट, मु.कासने, पो.वासिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे या पर्यटन स्थळाचा विकास करण्याकरीता रु.१,६३,१४,०००/- (रुपये एक कोटी त्रेसष्ट लाख चौदा हजार फक्त) इतक्या अंदाजित खर्चाचे काम ठेव अंशदान स्वरुपात समन्वयक तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्याकडे अधिनस्त असलेल्या निधीतून करण्यात यावे.

४. सदर योजनेअंतर्गत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच योजनेअंतर्गत मंजूर निधीचे वितरण हे संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद २ (२) मध्ये नमूद अटीच्या अधीन काटेकोरपणे करण्याची जबाबदारी आयुक्त, समजाकल्याण, पुणे यांची राहील.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१८०२१५१७२३५५८७२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.02.15 17:34:19 +05'30'

(अनिल कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे.
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे.
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा/लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, मुंबई.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे.
९) जिल्हाकोषागार अधिकारी, ठाणे.
१०) अध्यक्ष, यांनी दिपांकर विपश्यना मेमोरियल ट्रस्ट, मु.कासने, पो.वासिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे.
११) निवडनस्ती.